॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.३० ( ) सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त उद्या बुधवार, दि.३१ ऑक्टोबर रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात राष्ट्रीय एकता दिवसाचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्या सकाळी विद्यापीठात मुलांच्या आणि मुलींच्या वसतिगृहापासून एकता दौडचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक व कर्मचारी सहभागी होणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या वतीने देण्यात आली आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२० ( ) राष्ट्रीय महिला आयोगाच्या डिजिटल शक्ती या उपक्रमांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील महिलांसाठी उद्या बुधवार दि.३१ ऑक्टोबर रोजी सायबर सुरक्षा या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रामार्फत सकाळी १० वाजता सिनेट सभागृहात हा कार्यक्रम होणार असून सायबर पीस फाऊंडेशन, पुणे येथील संशोधन व्यवस्थापक अमेय परातकर हे डिजिटल साक्षरता आणि ऑनलाईन सुरक्षा कार्यक्रम या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील हे अध्यक्षस्थानी असतील अशी माहिती या कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ.स्नेहलता शिरुडे यांनी दिली.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 30 ऑक्टोबर,2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी